## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५५८७/२०२५
वोर्ड क्र.१३

श्री.इरफान बद्रोद्दीन शेख, — अपिलार्थी
मु.पो.शेवगा, ता.अंबड जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, : उत्तरवादी क्र.२
जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०८.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०७.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| जिल्हयातील सर्व आरोग्य संस्थेतील कार्यरत असलेल्या वर्ग ४ कर्मचारी यांची पदनिहाय मंजूर, भरलेली व रिक्त पदांची माहिती बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती दि.२६.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.०८.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 1660 दि. 10|2|2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४१४२/२०२५
वोर्ड क्र.१४

श्री.राजेंद्र कुमार किसनलाल जायस्वाल, छत्रपती शिवाजी महाराज चौक बदनापूर, ता.बदनापूर, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, नगर पंचायत कार्यालय बदनापूर, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत कार्यालय बदनापूर, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १६.०६.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०१५ ते माहिती प्राप्त होईपर्यंत नगर पंचायत, बदनापुर मार्फत शासनास पाठविण्यात आलेल्या विकास आराखडयाची संपुर्ण संचिका तक्रार/ आक्षेप अर्जासह माहिती . |

आज रोजी सुनावणी दरम्यन जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरूपाची असल्याने दि.०९.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे कार्यालयात येऊन उपलब्ध माहितीची तपासणी / निरीक्षण करावे व त्यानुसार आवश्यक असलेली माहिती नियमाप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. मात्र अपिलार्थी माहितीच्या निरीक्षणाकरीता कार्यालयात उपस्थित राहीले नसल्याने त्यांना माहिती उपलब्ध करून देता आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरीता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये जाणुन बजुन माहिती दडविण्याचा प्रयत्न, असे कारण नमुद केलेले आहे. अभिलेखावरून दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये विस्तृत व व्यापक स्वरूपाच्या माहितीची मागणी केलेली

आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०९.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहितीच्या अवलोकनाची संधी उपलब्ध करून दिलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1661  दि. 10/2/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१३३८/२०२५
बोर्ड क्र.१५

श्री.मोहसीन रशीद शीकलगार, अपिलार्थी
रा.कृषि उत्पन्न बाजार समिती मार्केट यार्ड गेट नं.१ शेजारी पहिला मजला चांदवड रोड, मनमाड, ता.नांदगांव, जि.नाशिक

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, नगर पंचायत कार्यालय बदनापूर, जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर पंचायत कार्यालय बदनापूर, जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०१.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे विधिज्ञ, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २०.१२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मयत जावेद अनवर शेख याच्या मृत्युचा दाखला व इतरबाबत माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.०१.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1662 दि. 10/2/2026

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४३३२/२०२५
बोर्ड क्र.१६

श्री.दत्तात्रय हरी मिसाळ, — अपिलार्थी
रा.घर क्र.ए-१०, भानुदास नगर, जवाहर कॉलनी रोड, आकाशवाणी परीसर छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, नगर पंचायत कार्यालय बदनापूर, जि.जालना : उत्तरवादी क्र.१
२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर पंचायत कार्यालय बदनापूर, जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१९.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.०५.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.०१.०९.२०२४ पासून आजपर्यंत साफ सफाईचे कंत्राट कोणत्या एजन्सीला देण्यात आले त्या एजन्सीला दिलेली वर्क ऑर्डर अटी शर्ती इ.बाबत |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे प्रश्नार्थक स्वरूपाच्या माहितीची मागणी केलेली असल्याने दि.१७.०६.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे हे अवगत केल्यास माहिती उपलब्ध करून देणे सोईचे होईल, असे कळविण्यात आलेले आहे. अभिलेखावरून दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२०.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना ०७ दिवसात माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, नगर पंचायत कार्यालय बदनापूर, जि.जालना यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी नगर पंचायत कार्यालय बदनापूर, जि.जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 1663 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४७०७/२०२५
बोर्ड क्र.१७

श्री.अमित अयुब शेख, — अपिलार्थी
रा.पोलीस स्टेशन समोर, जालना औरंगाबाद महामार्ग बदनापूर,
ता.बदनापूर, जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नगर पंचायत कार्यालय बदनापूर, जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर पंचायत कार्यालय बदनापूर, जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| बदनापूर शहरात प्रशासना मार्फत बसविण्यात आलेल्या सोलार पॅनल चलीत पथदिव्या संबंधी काढलेल्या निविदा, सुचना, मागविलेल्या हरकती, पारीत केलेली कंत्राटे इ.बाबत |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली बहुतांश माहिती ही Public Domain वर उपलब्ध असुन ती प्राप्त करून घ्यावी. तसेच जी माहिती Public Domain वर उपलब्ध नाही अशी माहिती कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करावे व आवश्यक असलेली माहिती नियमानुसार प्राप्त करून घ्यावी, असे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार दि.१७.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 1667 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ३३५९/२०२५ व ३३६०/२०२५
(एकुण २ अपीले)
श्री. शेख खालेद शेख अहेमद कुरेशी, : अपिलार्थी
रा.कुरेशी गल्ली परतुर, ता.परतुर जि.जालना. अनुपस्थित

विरुध्द

| बोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|
| १८, १९ | १. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतुर जि.जालना<br>२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतुर जि.जालना | उत्तरवादी क्र.१ अनुपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ अनुपस्थित |

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२४.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण २ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| १८ | २१.०२.२०२५ | मौजे परतुर येथील नगर परिषद हद्दीतील मिळकत क्र.८४१ हे घर नजमुन हसन कुरेशी यांचे नावे कशाच्या आधारावर झाले, त्याची संचिका मिळणेबाबत. |
| १९ | २१.०२.२०२५ | मौजे परतुर ता.परतुर जि.जालना न.प. हद्दीतील मिळकत क्र.२०८१/१ (१) वाटणी पत्रकाबाबत |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतुर जि.जालना यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतुर जि.जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. 1638 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय-अपील क्र.३३६३/२०२५
बोर्ड क्र.२०

श्री.अयुब शाहा महेबुब शाहा,
रा.युनुस कॉलनी, परतूर, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नगर पंचायत कार्यालय परतूर, जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर पंचायत कार्यालय परतूर, जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.०१.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| नगर परिषद हद्दीतील इनामी जमीन लाल मस्जिद गट क्र.३०१ या जमीनीवर झालेले बांधकाम पक्के बांधकामाची नगर परिषदेने बांधकाम परवानगी दिली का त्या बाबतची माहिती |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नगर पंचायत कार्यालय परतूर, जि.जालना यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी नगर पंचायत कार्यालय परतूर, जि.जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 1664 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४६१०/२०२५
वोर्ड क्र.२२

श्री.तरंग लक्ष्मणराव कांबळे, अपिलार्थी
निवासी फुले नगर, अंबड ता.अंबड जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता, नगर परिषद, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय अंबड, जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २७.०३.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सावित्रीबाई फुले मार्ग, मटन मार्केट या रस्त्याचे बांधकामाबाबत एकुण ८ मुद्दयांची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखातील उपलब्ध माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन ती आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आयोगासमक्ष माहिती उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1665 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्र. ५६६५ व ५६६६/२०२५**
(एकुण २ अपीले)
श्री.अय्युब सदलजी बागवान,
रा.कुरेशी मोहल्ला अंबड जि.जालना. : अपिलार्थी
उपस्थित

विरुध्द

| बोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|
| २३ | जन माहिती अधिकारी, नगर परिषद, अंबड जि.जालना<br><br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अंबड जि.जालना | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ प्रतिनिधी उपस्थित |

**(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)**
**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.०९.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण २ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| २३ | ०२.०९.२०२५ | सन २०१६ ते आज पर्यंत नगर परिषद, अंबड कार्यालयात कार्यरत सर्व मुख्याधिकारी व नगर अभियंता यांची नावे आणि त्यांच्या कार्यकाळचा तपशिल व इतर २ मुद्दयांची माहिती. |
| २४ | ०२.०९.२०२५ | अंबड नगर परिषदेच्या पॅनलवर असलेल्या सर्व खाजगी अभियांत्यांची यादी व इतर ४ मुद्दयांबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी बोर्ड क्र.२३ मधील माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अदयापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. तसेच बोर्ड क्र.२४ मधील माहिती अर्जान्वये अपुर्ण व दिशाभुल करणारी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.२३ मधील माहिती अर्जान्वये मागणी केलेली विस्तृत व मोठ्या कालावधीची असल्याने संकलीत करण्यास विलंब होत आहे. मात्र सदर माहिती आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच बोर्ड क्र.२४ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखातील उपलब्ध माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांच्या बोर्ड क्र.२३ मधील माहिती अर्जाचे अवलोकन केले असता मागणी केलेल्या माहितीचा, मा.अ.अ.२००५ मधील कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत समाविष्ट होत नाही. त्यामुळे सदर माहिती अपिलार्थी यांना देय होत नाही.

अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.२४ मधील माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थीस आयोगासमक्ष उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. १६५० दि.१०।२।२०२६

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. १२०५ व १२८६/२०२५
(एकुण २ अपीले)
श्री.शेरखॉन हमीदखॉन, : अपिलार्थी
मु.पो.ता.जाफ्राबाद जि.जालना. अनुपस्थित

विरुध्द

| वोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|
| २५ व २६ | १. जन माहिती अधिकारी, नगर पंचायत कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना.<br>२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना. | उत्तरवादी क्र.१ अनुपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ प्रतिनिधी उपस्थित |

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२६.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण २ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| वोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| २५ | ०९.०१.२०२५ | नगर पंचायतला विविध योजनासाठी प्राप्त निधि, खर्च, एम.बी, अंदाजपत्रके इ.बाबत. |
| २६ | ०९.०१.२०२५ | सन १९५० ते डिसेंबर २०२४ पर्यंत सर्व्हे नं.१ आणि २ मधील घेण्यात आलेल्या फेर फार नोंदीनुसार नमुना नं.४३ व ८ बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी सदर माहिती मिळाल्याबाबत लेखी स्वाक्षरीत पोच दिलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपीले निकाली काढणेबाबत विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांमध्ये अपिलार्थी यांचे निवेदन दिसुन येत आहे. सदर निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी दोन्ही माहिती अर्जान्वये मागणी केलेली सर्व माहिती मला मिळालेली आहे. सदर माहितीने माझे समाधान झाले असुन माझा कोणताही आक्षेप नाही म्हणुन मी माझे अपील मागे घेत आहे, असे स्वाक्षरीत नमुद केलेले आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन दोन्ही द्वितीय अपीले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. 1651 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.२८८७/२०२५
बोर्ड क्र.२७

श्री.पटाण सलमान खॉं अगिस खॉं, अपिलार्थी
रा.भोकरदन रोड, नवीन जाफ्राबाद(पुर्नवसन) ता.जाफ्राबाद
जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नगर पंचायत कार्यालय, जाफ्राबाद : उत्तरवादी क्र.१
जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर पंचायत : उत्तरवादी क्र.२
कार्यालय जाफ्राबाद, जि.जालना

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ११.०४.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| प्रधानमंत्री आवास योजना २.० शहरी अंतर्गत काम करणा-या एजन्सीला दिलेले अटी, शर्ती व नियम, शासन निर्णय इ.बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी, मागणी केलेली सर्व माहिती मिळाल्याबाबत तसेच सदर माहितीने समाधान झाले असुन कोणताही आक्षेप नाही, असे स्वाक्षरीत पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1668 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्र. २९०१ ते २९०४/२०२५**
**(एकुण ४ अपीले)**
श्री.महजाद इस्लाम खान, : अपिलार्थी
रा.रफिक कॉलनी, भोकरदन जि.जालना. उपस्थित

विरुध्द

| बोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|
| २८ ते ३१ | १. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, भोकरदन जि.जालना<br>२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, भोकरदन जि.जालना | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ अनुपस्थित |

**(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)**
**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१०.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण ४ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| २८ | २७.०३.२०२५ | भोकरदन नगर परिषद मालकीचे मुख्य मार्केट मध्ये शिवाजी पंडीतराव देशमुख गा I क्र.१ ते अवद बीन अली चाऊस गाळा क्र.९९ पर्यंत व शिवाजी मार्केट हरीश रमेश पवार गाळा क्र.१ ते नारायण आनंदा तळेकर गाळा क्र.३५ शिवाजी मार्केट पासुन आंबेडकर पुतळयापर्यंत संपुर्ण गाळयांचे किती भाडे वसुल करण्यात आले व कोणत्या दुकानाला किती भाडे व किती कर आहे इत्यादीबाबत. |

| | | |
|---|---|---|
| २९ | २७.०३.२०२५ | कोंडवाड्याबाबत |
| ३० | २७.०३.२०२५ | जमा कचरा, कचरा गाड्या, ड्रायव्हरचे नाव, मो.नं., कर्मचारी इ.बाबत. |
| ३१ | २१.०३.२०२५ | न.प.भोकरदन पत्र क्र.जा.क्र.२५/न.प.भो./४३० ची प्रमाणित प्रत व इतर बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अदयापपर्यंत माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने दि.११.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहितीचे अवलोकन करून आवश्यक असलेली माहिती नियमाप्रमाणे प्राप्त करून घेणेबाबत, अपिलार्थीस कळविण्यात आले. त्यानुसार अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन केले मात्र आवश्यक असलेल्या माहितीपोटी विहीत शुल्काचा भरणा केलेला नसल्याने त्यांना माहिती उपलब्ध करून देता आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे विस्तृत व व्यापक, मोघम स्वरूपाची माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोटया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब मा. अ.अ.२००५ चे कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त ४ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 1642 दि. 10/2/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५२८/२०२५
वोर्ड क्र.३२

श्री.राजेंद्र माणिकराव जाधव, अपिलार्थी
रा.रत्नमाला लॉन्स, जाफ्राबाद रोड, भोकरदन,
ता.भोकरदन जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कर अधिक्षक, नगर परिषद कार्यालय, भोकरदन जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, भोकरदन, जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १८.०९.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.११.०४.२०२२ दिलेल्या अर्जाबाबत कारवाईबाबत व इतर २ मुद्दयांची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०३.१०.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.०३.१०.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1669 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५२९/२०२५
वोर्ड क्र.३३

श्री.राजेंद्र माणिकराव जाधव, रा.रत्नमाला लॉन्स, जाफ्राबाद रोड, भोकरदन, ता.भोकरदन जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उप विभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, भोकरदन जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १८.०९.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.२५.०६.२०२२ रोजी दिलेल्या अर्जाबाबत कार्यालयाकडुन केलेल्या कार्यवाहीची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०३.१०.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र अ नुसार जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन यांचे कडे माहितीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०९.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे सदर माहिती अर्ज कलम ६(३) नुसार नगर परिषद भोकरदन या कार्यालयाकडे वर्ग केलेला आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी, नगर परिषद भोकरदन यांनी दि.०३.१०.२०२४ रोजी अपिलार्थी यांना व्यक्तीशः माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1670 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५८४३/२०२५
वोर्ड क्र.४०

श्री.कृष्णा सर्जेराव सावळे, — अपिलार्थी
मु.पो.गोंदी ता.अंबड जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्याल्य, घुगंर्डे हदगांव ता.अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१८.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १६.०८.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| हायमॅक्स विद्युत लाईट अहवालबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०७.०१.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.०१.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1671 दि. 10/2/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५३९२/२०२५
बोर्ड क्र.४१

श्री.सुभाष कारभारी निर्मळ पाटील,
रा.आर्य समाज मंदीरजवळ, परळी वैजिनाथ जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक संस्था प्रशासन, संलग्न जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सहकारी शक्ती इमारत, जालना रोड, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सहकारी शक्ती इमारत, जालना रोड, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २०.०८.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| वैद्यनाथ अर्बन को ऑप बँक लि.परळी वै.ता.परळी वै.जि.बीड संचालक मंडळ निवडणुक कार्यक्रम सन २०२५, नामनिर्देश पत्र, शपथपत्र व सोबत जोडण्यात आलेल्या सह पत्रांच्या सत्यप्रतीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०२.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.०२.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1672 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५५७९/२०२५
बोर्ड क्र.४२

श्री.काशिद महादेव आसाराम,
मु.पो.सा.पिंपरी ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,बीड बस स्थानकाच्या बाजुला, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,बीड बस स्थानकाच्या बाजुला, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०५.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.१०.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.१०.०९.२०२५ रोजी दिलेल्या तक्रारी अर्जावरील कार्यवाहीबाबत एकुण ३ मुद्दयांबाबत. |

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी अवगत केले की, माहिती अर्जात नमुद तक्रारीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी संबंधित आगार व्यवस्थापक यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली आहे. तथापि सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित आगार व्यवस्थापक यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत काहीही अवगत केलेले नाही. त्यामुळे माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती परिपुर्ण मिळाली असे म्हणणे उचित ठरणार नाही. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आगार व्यवस्थापकाशी केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिल्याच्या निष्कर्षावरून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. ही बाब योग्य वाटत नाही. वास्तविक आगार व्यवस्थापक यांच्याकडे हस्तांतरीत केलेल्या तक्रारीवर त्यांनी काय कार्यवाही केलेली आहे, अशी माहिती उपलब्ध करून देणे अभिप्रेत आहे. म्हणुन अशी माहिती उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज प्राप्त झाला त्यावेळी उपलब्ध असलेली माहिती म्हणजे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमुद तक्रार संबंधित आगार व्यवस्थापक यांच्याकडे हस्तांतरीत केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत अपिलार्थीस उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर उपलब्ध करून दिलेली माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विचारात घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. यासंदर्भात असेही नमुद करण्यात येत आहे की, अपिलार्थी यांच्या आगार व्यवस्थापक यांच्याकडे हस्तांतरीत केलेल्या तक्रारीसंदर्भात संबंधित आगार व्यवस्थापक यांनी केलेल्या पुढील कार्यवाहीबाबत दि.०९.०१.२०२६ रोजीच्या पत्रासोबत अहवाल विभाग नियंत्रक यांचेकडे सादर केलेला आहे. सदर अहवालाची प्रत उपलब्ध असुन ती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये चुकीची दिशाभुल करणारी माहिती, असे कारण नमुद केलेले आहे. तसेच आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी परिपुर्ण माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमुद तक्रारीसंदर्भातील पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करून दिले असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमुद तक्रारीवरील कार्यवाहीबाबतच्या अहवालाची प्रत अपिलार्थीस उपलब्ध करून दिली असल्याचे दिसुन येत नाही. सदर अहवालाची प्रत अभिलेखामध्ये उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणी दरम्यन अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,बीड बस स्थानकाच्या बाजुला, बीड यांनी अपिलार्थी यांना वर नमुद केल्याप्रमाणे माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,बीड बस स्थानकाच्या बाजुला, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे..

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ १६५५ दि. 10/2/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५५५६/२०२५
बोर्ड क्र.४३

श्री.ॲड.सुधीर ज्ञानोबा खाडे, विद्यानगर (पश्चिम), जेल रोड, साईबाबा हॉस्पीटलसमोर, बीड. — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, बीड शहर उप विभाग कार्यालय, बीड : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, बीड शहर उप विभाग कार्यालय, बीड : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.०८.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.२५.०७.२०२५ रोजी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, बीड शहर उपविभाग कार्यालय, बीड यांना दाखल केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता मागणी केलेली माहिती हि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही. त्यामुळे सदर माहिती देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1645 दि. 10/2/2026

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्र. ५६९१ ते ५६९४/२०२५**
(एकुण ४ अपीले)
श्री.लक्ष्मण प्रल्हाद पाटील,
रा.सुमठाणा पो.टाकळी (वा.), ता.उदगीर जि.लातुर : अपिलार्थी
अनुपस्थित

विरुध्द

| वोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ४५ | ५४९१/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वसुंधरा प्राथमिक अनु.जाती आश्रम शाळा, केज जि.बीड<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ प्रतिनिधी उपस्थित |
| ४६ ते ४८ | ५६९२/२०२५ ते ५६९४/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.छत्रपती शाहु प्राथमिक / माध्यमिक (अ.जा.) आश्रम शाळा, बर्दापुर ता.अंबाजोगाई जि.बीड<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ प्रतिनिधी उपस्थित |

**(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१०.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण ४ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| वोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ४५ | ११.०७.२०२५ | सन २०१५ ते २०२५ पर्यंत शाळेत कार्यरत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नावे, पद, पात्रता, नियुक्ती इ.बाबत |

| | | |
|---|---|---|
| ४६ | २३.०७.२०२५ | सन २०१५ ते २०२५ या वर्षातील नवीन नियुक्त्यांची संपुर्ण प्रक्रीया, जाहीरात, अर्जाची यादी, निवड समितीचा अहवाल, अंतिम यादी आदेश इ.बाबत. |
| ४७ | ०७.०७.२०२५ | इ.स.२०१० ते २०२५ पर्यंत कार्यरत असलेल्या सर्व कर्मचारीयादी व त्यांचे नियुक्ती आदेश प्रती, सर्व कर्मचारी यांचे शैक्षणीक व जात प्रमाणपत्रांच्या प्रती इ.बाबत. |
| ४८ | ०७.०७.२०२५ | इ.स.२०१० ते २०२५ पर्यंतशाळेत कार्यरत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे नावासहीत शिक्षण पद पात्रता आणि TET पात्र प्रमाणपत्रे, सर्व कर्मचा-यांचे जातप्रमाणपत्र इ.बाबत |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली बहुतांश माहिती हि विस्तृत, व्यापक व मोघम स्वरूपाची असुन ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोटया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही. त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७(७) व कलम ११(१) नुसार त्रयस्थ पक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे हि बाब नैसर्गीक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. यानंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. याप्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही जनहित दिसुन येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त ४ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 1628 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र.५६९५ व ५६९६/२०२५
(एकुण २ अपीले)

| | | |
|---|---|---|
| श्री.लक्ष्मण प्रल्हाद पाटील,<br>रा.सुमठाणा, पो.टाकळी (वा), ता.उद्गीर जि.लातुर-४१३५१७. | : | अपिलार्थी<br>अनुपस्थित |

विरुध्द

| वोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ४९ | ५६९५/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.छत्रपती शाहु प्राथमिक आश्रमशाळा अनु.जाती बर्दापुर, ता.अंबाजोगाई जि.बीड<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ प्रतिनिधी उपस्थित |
| ५० | ५६९६/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वसुंधरा माध्यमिक अनु. जाती आश्रम शाळा, केज जि.बीड<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ प्रतिनिधी उपस्थित |

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

### निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१०.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण २ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ४९ | २३.०७.२०२५ | सन २०१५ ते २०२५ या कालावधीतील शाळेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची नियुक्त्यांचे संपुर्ण प्रक्रिया / जाहिरात व इतरबाबत. |
| ५० | ११.०७.२०२५ | सन २०१५ ते २०२५ या कालावधीतील शाळेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची पदे, शैक्षणीक पात्रता, नियुक्ती आदेश, नावे इ.बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या बोर्ड क्र.४९ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती वैयक्तीक स्वरूपाची असल्याने देता येऊ शकत नाही, तसेच बोर्ड क्र.५० मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१०.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने कार्यालयीन वेळेत उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करून आवश्यक असलेली माहिती प्राप्त करून घ्यावी, असे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हि विस्तृत, व्यापक व मोघम स्वरूपाची असुन ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

प्र शा इं

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 1631    दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ५८६६ व ५८६८, ५८६९/२०२५
(एकुण ३ अपीले)
श्री.रमेश शेषेराव गायसमुद्रे, : अपिलार्थी
रा.सिद्धार्थ नगर, अंबाजोगाई जि.बीड . उपस्थित

विरुध्द

| वोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|
| ५१ ते ५३ | १. जन माहिती अधिकारी तथा गृहपाल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वस्तीगृह, अंबाजोगाई जि.बीड<br>२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग, बीड. | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ प्रतिनिधी अनुपस्थित |

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

### निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१८.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण ३ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| वोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ५१, ५२ | १२.०९.२०२५ | वस्तीगृहातील शासकीय कंत्राटी व BVG कर्मचा-यांची माहिती मिळणेबाबत. |
| ५३ | ०४.०९.२०२५ | वस्तीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या भोजनाबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अदयापपर्यंत माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली व अभिलेखातील उपलब्ध असलेली माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन ती आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती सुनावणी दरम्यान आयोगाने निर्देशीत केल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष माहिती उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन ३ द्वितीय अपीले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त ३ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. १६५३ दि. १०/२/२०२६

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील.क्र.५७४९/२०२५
बोर्ड क्र.५४

श्री.अबुतालीब हबीब चाऊस, — अपिलार्थी
रा.शेंबाळपिंपरी, ता.पुसद जि.यवतमाळ

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१५.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २८.१०.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.०२.१०.२०१६ रोजी हबीब अब्दुल रहमान चाऊस यांच्या मृत्यु नोंद प्रमाणपत्राच्या प्रती व इतर बाबत. |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 1646 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५७९५/२०२५
वोर्ड क्र.५५

श्री.चोले गणेश रामकिशन — अपिलार्थी
ह.मु.पो.संतोषीमाता नगर, गल्ली नं.३, मुकुंदवाडी, छ.संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार-महसुल, तहसिल कार्यालय, सेनगांव जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, सेनगांव जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१७.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.१०.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| ऑनलाईन ७/१२ ला बेकायदेशिररित्या लागलेल्या नावाबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचा अभिलेखात शोध घेतला असता, सदर माहिती अभिलेखात आढळुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही. अत: याप्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन अधिनियमातील कलम १९(८)(क)(दोन) नुसार आयोगास प्राप्त अधिकारन्वये तहसिलदार, तहसिल कार्यालय, सेनगांव जि.हिंगोली यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणुन निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, सेनगांव जि.हिंगोली यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहितीसंदर्भात कार्यालयीन कर्मचारी यांचा गट तयार करून सदर माहितीचा शोध घ्यावा व कार्यवाही दरम्यान उपलब्ध झालेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार विनामुल्य अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, सेनगांव जि.हिंगोली यांना आदेशित करण्यात येते की, शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील अभिलेख जतन करून ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुद्ध अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार संबंधित पोलीस स्टेशन मध्ये F.I.R.दाखल करण्याची कारवाई करावी, अशी कार्यवाही करताना सर्व वस्तुनिष्ठ बाबींची शहानिशा करण्यात यावी.

३. उपविभागीय अधिकारी, सेनगांव जि.हिंगोली यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./1647 दि.10/2/2026

प्रत - आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,
उपविभागीय अधिकारी, सेनगांव जि.हिंगोली

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५७२३/२०२५
वोर्ड क्र.५७

श्री.विनायक माणिकराव सोनटक्के, रा.जांभरून ता.पो.कळमनुरी जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मसोड ता.कळमनुरी जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक निरंक रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| नायब तहसिलदार, कळमनुरी यांनी दि.३०.०६.२०२५ रोजी दिलेल्या पत्रकातील निर्देशानुसार केलेल्या कार्यावाहीबाबत व इतर ३ मुद्दयांची माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1648 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५७२४/२०२५
वोर्ड क्र.५८

श्री.विनायक माणिकराव सोनटक्के, — अपिलार्थी
रा.जांभरून ता.पो.कळमनुरी जि.हिंगोली

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.११.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांचे दि.१७.०४.२०२५ रोजी दिलेल्या पत्रकातील निर्देशानुसार या कार्यालयाने केलेल्या कार्यावाहीबाबत व इतर ४ मुद्दयांची माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता माहिती अर्जातील मागणी केलेली माहिती हि माहितीचा अधिकार अधिनियम २००५चे कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1649 दि. 10/2/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ५७९३ व ५७९४/२०२५, ५३७४/२०२५
(एकुण ३ अपीले)

श्री.विनायक माणिकराव सोनटक्के, : अपिलार्थी
रा.जांभरुन ता.कळमनुरी जि.हिंगोली. उपस्थित

विरुध्द

| बोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|
| ५९, ६० व ६२ | १. जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जांभरून ता.कळमनुरी जि.हिंगोली.<br>२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ प्रतिनिधी उपस्थित |

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१७.१२.२०२५ व २४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण ३ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ५९, ६० | १९.०८.२०२५<br>२०.८.२०२५ | ग्रामपंचायत अधिकारी यांना लोकसेवक या नात्याने अर्जदाराचा दि.०१.०७.०२५ चा टपाली अर्ज स्विकारणे बंधनकारक आहे किंवा ऐच्छिक आहे याची माहिती व इतर २ मुद्दयांबाबत. |

| | | |
|---|---|---|
| ६२ | २३.०६.२०२५ | जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली यांचे दि.२४.०१.२०२५ रोजी दिलेल्या पत्रकातील निर्देशानुसार या कार्यालयाने कोणती कार्यवाही केली याबाबत लेखी माहिती व इतर ३ मुद्दयांची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अदयापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या विचाराधिन तिन्ही द्वितीय अपीलातील माहिती अर्जांचे अवलोकन केले असता माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचा, मा.अ.अ.२००५ मधील कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत समाविष्ट होत नाही. त्यामुळे सदर माहिती अपिलार्थी यांना देय होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त ३ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 1626 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५३७२/२०२५
वोर्ड क्र.६१

श्री.विनायक माणिकराव सोनटक्के, — अपिलार्थी
रा.जांभरून ता.पो.कळमनुरी जि.हिंगोली

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ सहायक (MREGS), पंचायत समिती कळमनुरी जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १७.०७.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मनरेगा अंतर्गत सिंचन विहीरींचे अकुशल बील अद्यापपर्यंत वितरीत न होण्यास व प्रलंबीत राहण्यास होणा-या विलंबाच्या कारणांची माहिती व इतर ४ मुद्यांची माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता माहिती अर्जातील मागणी केलेली माहिती हि माहितीचा अधिकार अधिनियम २००५चे कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./1650 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५४१६/२०२५
वोर्ड क्र.६२

श्री.अनुरथ सिताराम बनसोडे, — अपिलार्थी
डॉ.आंबेडकर नगर, परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.), औंढा नागनाथ जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, हिंगोली : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२५.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २६.०८.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०२० ते आजपर्यंत वन परिक्षेत्र अधिकारी, औंढा नागनाथ यांच्या कार्यक्षेत्रात ओसाड पडलेल्या जमिनीची यादी तसेच जमिनीचे जिपीएस लोकेशन फोटो. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता माहिती अर्जातील मागणी केलेली माहिती हि माहितीचा अधिकार अधिनियम २००५चे कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1651 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ५५६७ ते ५५७६/२०२५
(एकुण १० अपीले)

श्री.गणेश शंकर काळे, : अपिलार्थी
रा.चोंढी खुर्द ता.सेनगांव जि.हिंगोली अनुपस्थित

विरुध्द

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ६४ | ५५६७/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, माझोड ता.सेनगांव जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ उपस्थित |
| ६५ | ५५६८/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कहाकर बु ता.सेनगांव जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ उपस्थित |
| ६६ | ५५६९/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिदेफळ ता.सेनगांव जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ उपस्थित |
| ६७, ६९, ७०, ७३ | ५५७०/२०२५, ५५७२/२०२५ ५५७३/२०२५ ५५७६/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चोंढी खुर्द ता.सेनगांव जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ उपस्थित |
| ६८ | ५५७१/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हिवरखेडा ता.सेनगांव जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ७१ | ५५७४/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, खैरखेडा ता.सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.२ उपस्थित |
| ७२ | ५५७५/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बटवाडी ता.सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.२ उपस्थित |

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

निर्णय

अपिलार्थी यांनी दि.०५.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण १० द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ६४ ६५, ७०, ७२ | ११.०९.२०२५ ०८.०९.२०२५ | १५ वा वित्त आयोग कामाचे कृती आराखडा, मोजमाप पुस्तीका, अंदाजपत्रक, प्रशासकीय मान्यता, कामाचे फोटो, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, पासबुक, स्टेटमेंट इ. |
| ६६ ते ६९, ७१ | ११.०९.२०२५, ०८.०९.२०२५ | सन २०२१ ते आजपर्यंत सर्व ग्रामसभा, मासिक सभा, महिला ग्रामसभा, प्रोसेडिंग बुक, ठराव बुक प्रतीबाबत. |
| ७३ | १५.०७.२०२५ | १५ वा वित्त आयोगातुन केलेल्या कामाची मोजमाप पुस्तिका, इस्टीमेट किंद, व्हाऊचर. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवादात अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२४.११.२०२५, दि.२६.११.२०२५ व दि.१३.०१.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ५८०० ते ५८१२/२०२५
(एकुण १२ अपीले)

ॲड.प्रज्ञावंत काशीराम मोरे,
रा.राजगृह निवास, पेहणी ता.जि.हिंगोली : अपिलार्थी
उपस्थित

विरुध्द

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ७४ ते ७६ | ५८००/२०२५ ते ५८०३/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, देऊळगांव (जं) ता. सेनगांव जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ उपस्थित |
| ७७ ते ८१ ८४, ८५ | ५८०४/२०२५ ते ५८०८/२०२५, ५८११/२०२५, ५८१२/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, रोहीला खुर्द ता.जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी- पं., पंचायत समिती, हिंगोली | उत्तरवादी क्र.१ अनुपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ उपस्थित |
| ८२, ८३ | ५८०९/२०२५ व ५८१०/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जांभरून(बु.) ता.सेनगांव जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ उपस्थित |

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१७.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण १२ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ७४ | ३०.०७.२०२५ | मौजे देऊळगांव (जं) ता. सेनगांव येथील सन २०१९ ते ३० जुलै २०२५ पर्यंत घरपट्टी व इतर मार्गाने जमा झालेल्या निधी/ पैसा व खर्चाचे विवरणबाबत एकुण ८ मुद्दया माहिती. |
| ७५ | ३०.०७.२०२५ | सन २०१९ ते दि.३०.०७.२०२५ पर्यंत दलीतवस्ती सुधार योजनाबाबत एकुण १० मुद्दयांची माहिती. |
| ७६ | ३०.०७.२०२५ | सन २०१९ ते २०२५ पर्यंत १४ वित्त आयोगाची एकुण ९ मुद्दयांची माहिती. |
| ७७ | २१.०८.२०२५ | सन २०१९ ते दि.२०.०८.२०२५ पर्यंतच्या मासिक, विशेष, ग्रामसभा याची व इतर ७ मुद्दयांची माहिती. |
| ७८ | २१.०८.२०२५ | सन २०१९ ते दि.३०.०७.२०२५ पर्यंतच्या NA लेआऊट व फेर फार खरेदी विक्रीबाबत एकुण ७ मुद्दयांची माहिती. |
| ७९ | २१.०८.२०२५ | सन २०१९ ते दि.१९.०८.२०२५ पर्यंत दलीतवस्ती सुधार योजनाबाबत एकुण ९ मुद्दयांची माहिती. |
| ८० | २१.०८.२०२५ | सन २०१९ ते दि.३०.०७.२०२५ पर्यंतच्या ग्रा.पा.पुरवठा योजनेची एकुण १० मुद्दयांची माहिती. |
| ८१ | २१.०८.२०२५ | सन २०१९ ते दि.३०.०७.२०२५ पर्यंतच्या नाली दुरुस्ती बांधकाम, स्वच्छता व इतर १० मुद्दयांची माहिती. |
| ८२ | ३०.०७.२०२५ | सन २०१९ ते दि.३०.०७.२०२५ पर्यंत पाणि पुरवठासाठी केलेल्या विकास कामाबाबत एकुण १२ मुद्दयांची माहिती. |
| ८३ | ३०.०७.२०२५ | सन २०१९ ते दि.३०.०७.२०२५ पर्यंत १४ व्या वित्त आयोगाच्या कामाबाबत एकुण ११ मुद्दयांची माहिती. |
| ८४ | २१.०८.२०२५ | सन २०१९ ते दि.१९.०८.२०२५ पर्यंत १४ व्या वित्त आयोगाच्या कामाबाबत एकुण ११ मुद्दयांची माहिती. |
| ८५ | २१.०८.२०२५ | सन २०२१ ते दि.२१.०८.२०२५ मध्ये केलेल्या जलजिवन मिशन योजनेची एकुण माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, बोर्ड क्र.७४ ते ७६ व ८२, ८३ मधील माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली आहे. तथापि बोर्ड

क्र.७७ ते ८१ व ८४, ८५ मधील माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी हे वारंवार माहितीचे अर्ज करून प्रशासनावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अपिलार्थी हे कार्यालयाकडे विस्तृत, व्यापक स्वरूपाची माहितीची मागणी करतात. अपिलार्थी यांच्या अशा भुमिकेचा दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते. अपिलार्थी यांना मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची असल्याने त्याबाबत माहितीच्या अवलोकनाची अपिलार्थीस संधी उपलब्ध करून दिली असता, ते माहितीच्या अवलोकनाकरीता कार्यालयात उपस्थित राहत नाही. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.२३.०९.२०२५ व १६.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचे विचाराधीन द्वितीय अपीले निकाली काढण्यात यावीत, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमक्ष उपलब्ध कागदपत्रावरून अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, मागणी केलेली बहुतांश माहिती विस्तृत, व्यापक स्वरूपाची असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीतुन काही जनहित साध्य होईल, असे दिसत नाही. वर नमुद अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरूप विचारात घेता, अशी मागणी एकत्रीत / संकलीत करण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामुग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागणार आहे. ही बाब कलम ७ (९) नुसार योग्य ठरणार नाही. यामुळे असे माहितीचे अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाहीत. तसेच अपिलार्थी यांनी ज्या पद्धतीने मोठ्या प्रमाणावर माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत त्याचा विपरीत परिणाम सार्वजनिक प्राधिकरणातील दैनंदिन कामकाजावर निश्चितपणे होईल, ही बाब या ठिकाणी नजरअंदाज करून चालणार नाही.

५. तसेच अशा प्रकरणासंबंधात मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties

under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

६. एकाच व्यक्तीने मोठया प्रमाणावर केलेल्या माहिती अर्जामुळे शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

७. तसेच अपिलार्थी यांचा माहिती अर्ज पाहता, त्यांनी विस्तृत व मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. याबाबत मा.उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

८. प्रस्तुत प्रकरणातील आयोगासमक्ष झालेला युक्तिवाद तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती व राज्य माहिती आयोगाने वेळोवेळी पारीत केलेले निर्णय याप्रकरणी विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल

(४/२)

व माहिती अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणीस गतिरोध निर्माण होईल, या निष्कर्षाप्रत येऊन आयोग खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

अपिलार्थी यांची उपरोक्त १२ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 1637 दि. 10/2/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५८५१/२०२५
बोर्ड क्र.८६

श्री.नागनाथ मोतीराम मुळे, — अपिलार्थी
रा. इंदीरानगर, औंढा नागनाथ ता.औंढा नागनाथ जि.हिंगोली

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सुरेगांव तुर्क पिंपरी, ता.औंढा नागनाथ जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, औंढा नागनाथ जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि. १९.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.०५.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| ग्रामपंचायत कार्यालय, सुरेगांव तुर्क पिंपरी, अंतर्गत २०२०-२०२५ पर्यंत झालेल्या विकास कामाबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता माहिती अर्जातील मागणी केलेली माहिती हि माहितीचा अधिकार अधिनियम २००५चे कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1652 दि. 10/2/2026

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ५७९६ ते ५७९८/२०२५
(एकुण ३ अपीले)

श्री.आनंद लक्ष्मण खरे, : अपिलार्थी
रा.भाग्य नगर नांदेड रोड वसमत, उपस्थित
ता.वसमत जि.हिंगोली

विरुध्द

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ८७ | ५७९६/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, शिरड शा.ता.औंढा नागनाथ जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, औंढा नागनाथ जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ अनुपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ अनुपस्थित |
| ८८ | ५७९७/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कळमनुरी जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ अनुपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ अनुपस्थित |
| ८९ | ५७९८/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, वसमत जि.हिंगोली<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, वसमत जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१ अनुपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ अनुपस्थित |

## (सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)
## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१७.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण ३ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| वोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ८७ | १९.०६.२०२५ | औंढा तालुक्यातील कृषी निविष्ठा वाटपाबाबत एकुण ३ मुद्दयांची माहिती. |
| ८८ | १०.०७.२०२५ | कळमनुरी तालुक्यातील कृषी निविष्ठा वाटपाबाबत एकुण ३ मुद्दयांची माहिती. |
| ८९ | १८.०६.२०२५ | संगणक प्रणालीवर नोंदणी केलेल्या शेतक-यांना शासनाच्या उद्दीष्टाप्रमाणे मोफत बियाणे वाटप केल्याच्या माहितीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हि विस्तृत, व्यापक व मोघम स्वरूपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त ३ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 1636 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
भचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५७९९/२०२५
बोर्ड क्र.९०

श्री.आनंद लक्ष्मण खरे, अपिलार्थी
रा.भाग्य नगर, नांदेड रोड, वसमत जि.हिंगोली

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौंडी (तांडा), ता.वसमत जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौंडी (तांडा), ता.वसमत जि.हिंगोली : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१७.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| व्यायाम शाळेसंदर्भात एकुण ४ मुद्दयांची माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौंडी (तांडा), ता.वसमत जि.हिंगोली यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौंडी (तांडा), ता.वसमत जि.हिंगोली यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 1653 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ५५३३ व ५५३४/२०२५
(एकुण २ अपीले)

श्री.दादाराव संभाजी मुंडे, : अपिलार्थी
रा.कंडक्टर कॉलनी, परळी वैजीनाथ, ता.परळी वै. जि.बीड उपस्थित

विरुध्द

| वोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|
| ९१, ९२ | जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार (आस्था व लेखा), उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, परळी वै., जि.बीड<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, परळी वै., जि.बीड | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ उपस्थित |

### (सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)
### निर्णय

अपिलार्थी यांनी दि.०३.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण २ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| वोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ९१ | ०८.०९.२०२५ | न.भु.नं.३९३० सिट नं.३५ या संचिकेचे संपुर्ण कागदपत्रे. |
| ९२ | ०८.०९.२०२५ | न.भु.नं.४२२९ सिट नं.३८ या संचिकेचे संपुर्ण कागदपत्रे. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहितीचा कार्यालयीन अभिलेखात शोध घेतला आता, सदर माहिती अभिलेखात आढळुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अभिलेखात आढळुन येत नसल्याबाबत आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केलेले आहे. अत: याप्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन अधिनियमातील कलम १९(८)(क)(दोन) नुसार आयोगास प्राप्त अधिकारान्वये उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, परळी वै., जि.बीड यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणुन निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, परळी वै., जि.बीड यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहितीसंदर्भात कार्यालयीन कर्मचारी यांचा गट तयार करून सदर माहितीचा कसोशिने शोध घ्यावा व कार्यवाही दरम्यान उपलब्ध झालेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार विनामुल्य अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.
२. जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, बीड यांना आदेशित करण्यात येते की, शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील अभिलेख जतन करून ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुद्ध अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार संबंधित पोलीस स्टेशन मध्ये F.I.R.दाखल करण्याची कारवाई करावी, अशी कार्यवाही करताना सर्व वस्तुनिष्ठ बाबींची शहानिशा करण्यात यावी.
३. प्रादेशिक उपसंचालक भुमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करीता प्राधिकृत करण्यात येत आहे.
४. उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 1633 दि. 10/2/2026

प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,

१. प्रादेशिक उपसंचालक, भुमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर
२. जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, बीड

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५१५१/२०२५
वोर्ड क्र.९३

श्री.सोमनाथ दादाराव डाके, अपिलार्थी
रा.तांबरी विभाग बार्शी नाका, धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नगर रचना विभाग, नगर परिषद कार्यालय, धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर रचना विभाग, नगर परिषद कार्यालय, धाराशिव : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०७.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| उपविभागीय अधिकारी यांचे दि.१२.१२.२०२४ च्या पत्रावरील कार्यवाहीबाबत व सदर प्रकरणी अर्जदाराने दि.१७.०३.२०२५ रोजी दिलेल्या माहिती अर्जाबाबत माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाक्षरे मागणी केलेली माहिती दि.१६.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस उपलब्ध करून दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी, नगर रचना विभाग यांनी दि.१६.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस उपलब्ध करून दिलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1654 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५१५२/२०२५
बोर्ड क्र.९४

श्री.सोमनाथ दादाराव डाके,
रा.तांबरी विभाग बार्शी नाका, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन सहायक निबंधक सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, धाराशिव : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| लोकशाही दि.५.५.२०२५ रोजी दिलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासन सहायक निबंधक सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 1655 दि. 10/2/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५३९८/२०२५
वोर्ड क्र.९५

श्री.सोमनाथ दादाराव डाके, — अपिलार्थी
रा.तांबरी विभाग बार्शी नाका, धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार महसुल-१, तहसिल कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २९.०८.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| तहसिल कार्यालय, तुळजापुर अंतर्गत काम करणा-या sc/st/obc/nt/dnt/प्रवर्गातील कर्मचारी यांची जात वैधता अभिलेख आणि अपत्य प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र इ.बाबत. |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये आंगतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८(१) (त्र) नुसार अपिलार्थीस देय होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 1656 दि. 10/2/2026

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र.५३९८ व ५३९९/२०२५
(एकुण २ अपीले)

श्री.सोमनाथ दादाराव डाके, : अपिलार्थी
रा.तांबरी विभाग, बार्शी नाका, धाराशिव अनुपस्थित

विरुध्द

| वोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ९६, ९७ | ५३९८/२०२५, ५३९९/२०२५ | जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ प्रतिनिधी उपस्थित |

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण २ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| वोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ९६ | २२.०७.२०२५ | तक्रारी निवेदनावरील कार्यवाहीबाबत. |
| ९७ | ०७.०५.२०२५ | अभिलेख पाहणी अर्जावरील कार्यवाहीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या बोर्ड क्र.९६ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०८.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, तसेच बोर्ड क्र. ९७ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०२.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०८.०१.२०२५ व दि.०२.०६.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. 1634 दि. 10/2/2026

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ५४३८ व ५४३९/२०२५
(एकुण २ अपीले)

श्री.अविनाश राजेंद्र पवार, : अपिलार्थी
रा.वासुदेव गल्ली, तुळजापुर जि.धाराशिव उपस्थित

विरुध्द

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ९८, ९९ | ५४३८/२०२५<br>५४३९/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा आस्थापना विभाग, नगर परिषद कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ अनुपस्थित |

### (सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)
### निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२६.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण २ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे, सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ९८ | २५.०७.२०२५ | बिंदुनामावली प्रस्ताव बाबत. |
| ९९ | २५.०७.२०२५ | नळ कनेक्शनबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखातील उपलब्ध माहिती दि.२२.०८.२०२५ व दि.१६.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. दि.२२.०८.२०२५ व दि.१६.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 1635 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१३४/२०२५
वोर्ड क्र.१००

श्री.महेश रमेश गायकवाड, रा.संभाजीनगर, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा पाणी पुरवठा विभाग, नगर परिषद, धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धाराशिव : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १२.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| महेश रमेश गायकवाड हे कामावर असतानाचे हजेरी रजिस्टर, पगारपत्रक इ.बाबत. |

आज सुनावणी दरम्यन अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अदयाप मिळालेली नाही. सदर माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अवगत केलेले आहे. सदर मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे अपेक्षीत असुन सदर मागणी केलेली माहिती स्वत:शी संबंधित असल्यामुळे ती उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही कंत्राटी कर्मचा-यांशी संबंधित असुन सदर मागणी केलेली माहिती ही संबंधित कंत्राटदाराकडे उपलब्ध आहे. सदर माहिती ही कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नसल्यामुळे ती उपलब्ध करून देता येणे शक्य होणार नाही. ही बाब अपिलार्थी यांना दि.०७.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये अनाधिकृत माहिती, असे कारण नमुद केलेले आहे. तसेच आज सुनावणी दरम्यन अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले

असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अभिप्रेत असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती अपिलार्थीस प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क) (दोन) नुसार मुख्याधिकारी, नगर परिषद, धाराशिव यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणुन निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./1666 दि. 10/2/2026

प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ५३४८ ते ५३५१/२०२५
(एकुण ४ अपीले)
श्री.बळवंतराव श्रीमंतराव कवडे,
रा.पशु वैद्यकीय दवाखान्यासमोरील गल्लीमध्ये वाशी, : अपिलार्थी
ता.वाशी जि.धाराशिव उपस्थित

विरुध्द

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १०१ ते १०४ | ५३४८/२०२५ ते ५३५१/२०२५ | जन माहिती अधिकारी, नगरपंचायत कार्यालय, वाशी जि.धाराशिव<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत वाशी, जि.धाराशिव | उत्तरवादी क्र.१ उपस्थित<br>उत्तरवादी क्र.२ उपस्थित |

(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)

निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२१.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण ४ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| १०१ | २३.०६.२०२५ | वाशी नगर परिषद ने खरेदी केलेल्या डस्टबीन (कचराकुंडी) निविदेच्या संचिकेच्या नक्कला मिळणेबाबत. |
| १०२ | २३.०६.२०२५ | जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ मधील कामाच्या संपुर्ण संचिकेच्या नकला मिळणेबाबत. |
| १०३ | २२.०९.२०२५ | वाशी न.प. मध्ये असलेल्या एकुण कर्मचा-यांची पदांची पदनामासह माहिती. |

| | | |
|---|---|---|
| १०४ | ०७.०७.२०२५ | प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० (PMAY U २.०) अंतर्गत घरकुल योजनेचे शासनाकडे पाठविलेल्या अर्ज / प्रस्ताव किंवा डी.पी. आर.ची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अदयापपर्यंत माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या बोर्ड क्र.१०१ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखातील उपलब्ध माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन ती आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच बोर्ड क्र.१०३ व १०४ मधील माहिती अर्जान्वये दि.१९.११.२०२५ व ०६.०८.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी बोर्ड क्र.१०१ मधील माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाच्या निर्देशानुसार आयोगासमक्ष अपिलार्थी यांना उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे. अभिलेखावरून दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना बोर्ड क्र.१०३ व १०४ मधील माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती दि.१९.११.२०२५ व ०६.०८.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिलेली आहे. तथापि बोर्ड क्र.१०२ मधील माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अदयापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगरपंचायत कार्यालय, वाशी जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांना बोर्ड क्र.१०२ मधील जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर पंचायत वाशी, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह चार द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 1629 दि. 10/2/2026

व्यक्तीश: माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर माहिती मिळाल्याबाबत अपिलार्थी यांची स्वाक्षरीत पोच आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचे विचाराधीन द्वितीय अपीले निकाली काढण्यात यावीत, अशी विनंती आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर दि.१४.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या विचाराधिन द्वितीय अपीलांतील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपीले निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त १० द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 1630 दि. 10/2/2026

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ५३५/२०२३

ॲड.अम्रितपाल सिंग खालसा, : अपिलार्थी
रा.प्लेजर पार्क पिंटो पार्कच्यासमोर,
ओ.टी.सेक्शन, उल्हासनगर, जि.ठाणे.

विरुध्द

| द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|
| ५३५/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक, तख्त सचखंड, श्री.हुजुर साहेब गुरुद्वारा बोर्ड अचल नगर, नांदेड | उत्तरवादी क्र.१ |
| | प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, तख्त सचखंड, श्री.हुजुर साहेब गुरुद्वारा बोर्ड अचल नगर, नांदेड | उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक १३.०१.२०२६)**

निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीट छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर आयोगाने दि.२२.०५.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला आहे. सदर पारित केलेल्या निर्णयाविरूध्द अपिलार्थी यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे रिट याचिका क्र.९९५६/२०२३ दाखल केलेली आहे. सदर रिट याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.१६.१२.२०२५ रोजी निर्देशित केल्याप्रमाणे प्रस्तुत द्वितीय अपिलावर आज रोजी सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीकरीता अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने श्री.स.बलविंदर सिंघ फौजी, सहायक अधिक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|
| २५.१०.२०२२ | १. Pl.provide me certified copy of the show cause notice issued in the matter of Shri Akhand sahib path fraud case.<br><br>२. Pl.provide me certified copy of the inquiry report submitted by S.Gursagar Singh Sukhmani<br><br>३. Pl.provide me certified copy of the final order/memo/result taken in the above case.<br><br>४. Pl.provide me certified copy of the entire file and noting in this regard.<br><br>५. Name, designation, contact details of १St appellate authority in this regard. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगासमोर दि.२२.०५.२०२३ रोजी सुनावणी होऊन आयोगाने खालीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहे.

**वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी निर्णयात नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती अर्जातील मुद्दा क्र.२,३,५ च्या संदर्भातील माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.**

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात ५ मुद्यांवर माहितीची मागणी केलेली आहे. आयोगाने आदेश पारीत करताना मुद्दा क्र.२, ३, ५ ची माहिती उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र, मुद्दा क्र.१ व ४ बाबत माहिती उपलब्ध करून देण्याचे निर्णयामध्ये नमुद नसल्याच्या सबबीवरून अपिलार्थी यांनी मा.उच्च न्यायालयाकडे रिट याचिका क्र.९९५६/२०२३ दाखल केलेली आहे. सदर रिट याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्देशित केलेले आहे.

**In view thereof, I am inclined to partly allow the writ petition and direct the state Information Commissioner to decide the proceedings afresh insofar as point nos.१ and ४ are concerned within a period of four weeks from today.**

मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशानुसार प्रस्तुत प्रकरणाची आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, आयोगाने दि.२२.०५.२०२३ रोजीच्या निर्णयाद्वारे आदेशित केल्याप्रमाणे माहिती अर्जातील मुद्दा क्र.२,३,५ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी

यांनी उपलब्ध करून दिलेली आहे. तथापि मुद्दा क्र.१ व ४ च्या संदर्भातील माहिती मिळाली नसल्यामुळे ती उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील प्रकरण हे चौकशी संदर्भात असुन चौकशी प्रकरणातील चौकशीची प्रक्रीया पुर्ण होऊन निर्णय अंतिम झालेला आहे. आयोगाने दि.२२.०५.२०२३ रोजीच्या निर्णयाद्वारे निर्देशित केलेली मुद्दा क्र.२, ३, ५ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस प्रदान करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरून, अपिलार्थीने त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात मुद्दा क्र.२, ३, ५ ची माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली असुन मुद्दा क्र.१ व ४ च्या संदर्भातील माहिती प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणी दरम्यान अवगत केलेले आहे. याप्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती चौकशी प्रकरणाशी संबंधित असुन चौकशीची प्रक्रीया पुर्ण होऊन निर्णय अंतिम झाला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणी दरम्यनं आयोगास अवगत केलेले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(ज) नुसार चौकशीची प्रक्रीया पुर्ण होऊन निर्णय अंतिम झाला नसल्यास माहिती देय होत नाही. मात्र याप्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील प्रकरणामध्ये चौकशीची प्रक्रीया पुर्ण होऊन निर्णय अंतिम झाला असल्याचे आज रोजी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केलेले आहे. म्हणुन आयोगाने दि.२२.०५.२०२३ रोजी पारीत केलेल्या निर्णयातील आदेश क्र.०२, ०३, ०४ कायम ठेवुन, आदेश क्र.०१ मध्ये अंशत: बदल करून आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक, तख्त सचखंड, श्री.हुजुर साहेब गुरुद्वारा बोर्ड अचल नगर, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमुद असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी मुद्दा क्र.१ व ४ च्या संदर्भातील माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक, तख्त सचखंड, श्री.हुजुर साहेब गुरुद्वारा बोर्ड अचल नगर, नांदेड श्री. हरजितसिंघ बलवंतसिंघ कडेवाले यांनी विहित मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द कलम १९(८)(ग) व २०(१) च्या तरतुदीनुसार कारवाई का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नाव व पदनामासह) आयोगाचे

आदेश प्राप्त होताच दिनांक ०७.०४.२०२६ रोजी द्वितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरुन त्यांचेविरुध्द कलम २० नुसार कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक तथा तख्त सचखंड, श्री.हुजुर साहेब गुरुद्वारा बोर्ड अचल नगर, नांदेड यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द चेअरमन, तख्त सचखंड, श्री.हुजुर साहेब गुरुद्वारा बोर्ड अचल नगर, नांदेड यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१.०३.२००८ नुसार कार्यवाही अनुसरावी.

४. चेअरमन, तख्त सचखंड, श्री.हुजुर साहेब गुरुद्वारा बोर्ड, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. 1602 दि. 4/2/2026

प्रत - आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,
चेअरमन, तख्त सचखंड, श्री.हुजुर साहेब गुरुद्वारा बोर्ड , नांदेड मार्फत अधिक्षक तथा तख्त सचखंड, श्री.हुजुर साहेब गुरुद्वारा बोर्ड अचल नगर, नांदेड